# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

# वार्षिक अहवाल : सन २०१८-२०१९

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्थापना व कार्य | ०३-०५ |
| २ | संचालक मंडळ | ०६-०७ |
| ३ | व्यवस्थापन | ०८-०९ |
| ४ | वित्तीय स्थिती | १०-१२ |
| ५ | इतर विभाग | |
| | (अ) बाजार समिती विभाग | १३-१४ |
| | (ब) निर्यात विभाग | १५-२५ |
| | (क)प्रकल्प विभाग | २६-२७ |
| | (ड) अभियांत्रिकी विभाग | २८-३१ |
| | (इ) संगणक विभाग | ३२-३४ |
| | (ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग | ३५-३८ |
| | (प) कृषि व्यापार विकास विभाग | ३९-४४ |
| | (फ) तळेगाव शेती विभाग | ४५-४५ |

# १. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. सन २०१८-१९ या वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने ३५ वे वर्ष पूर्ण केले आहे व कृषि पणन मंडळाचा ३५ वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी प्रयत्न केले आहेत.

**उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे.

२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.

३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.

४. बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.

५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.

६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.

७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.

८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.

९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.

१०. या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.

११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

**अंमलबजावणीतील प्रमुख कार्यक्रम**

१. विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार व्यवस्था विकसित करणेकरिता नव-नवीन सुधारणाबाबत सल्ला देणे व त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.
२. फळे भाजीपाला आणि फुले यांचे आयुष्य वाढविण्यासाठी सहकारी संस्थांना प्रशितीकरण करणे Value Addition Centre, शितगृहांची उभारणी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्धतेबरोबरच उभारणीस मार्गदर्शन करणे.
३. विविध फळे, फुले आणि भाजीपाल्याची रोपे / बियाणे / कंद यांची आयात करणे.
४. बाजार समित्यांची लिलाव प्रक्रीया व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करणे.
५. कृषि पणन मंडळ, पणन संचालनालय व बाजार समित्यांच्या कामकाजासाठी संगणक प्रणाली विकसित करुन कार्यान्वीत करणे.
६. बाजार समित्यांचे पदाधिकारी / अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
७. राज्यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित, कृषी आधारित प्रकल्प वाढविणे तसेच त्यामध्ये उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी मदत व मार्गदर्शन करणे.
८. विविध प्रदर्शनात भाग घेणे तसेच प्रदर्शनांचे आयोजन करणे.
९. शेतमाल तारण योजना राबविणेसाठी बाजार समित्यांना सवलतीच्या दराने कर्ज देणे.
१०. शेतमाल निर्यातवृध्दी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाचे नमुने परदेशात पाठविणे, निर्यातीबाबतची माहिती शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांना देणे व त्यांच्या मालाची निर्यात करुन देणे.
११. प्रकल्प अहवाल तयार करणे.
१२. तळेगांव ताभाडे येथील शेतीवर आधुनिक शेतीचे प्रयोग राबविणे.
१३. व्ही. एच. टी प्रकल्पातील सोई सुविधांचा व्यावसायिक उपयोग शेतकरी, निर्यातदार यांना करुन देणे.
१४. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा तसेच अनुदान मिळवून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे.
१५. बाजार समित्यांना राज्यातील तसेच परराज्यातील अभ्यास दौऱ्यांसाठी मार्गदर्शन करणे.
१६. "कृषि पणन मित्र" मासिकाचे प्रकाशन आणि वितरण करणे.
१७. 'उत्पादक ते ग्राहक' योजना वेगवेगळ्या शहरांमध्ये राबविणेकरिता संस्थांना प्रोत्साहीत करणे.
१८. प्रसिध्दी माध्यमांशी योग्य समन्वय ठेवून कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांना प्रसिध्दी देवून त्यांची माहिती बाजार समिती, शेतकरी, शेतकऱ्यांच्या संस्था यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचे फायदे शेतकऱ्यांना करुन देणे.
१९. राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेअंतर्गत माती परिक्षण, शेतकरी प्रशिक्षण तसेच सुगी पश्चात तंत्रज्ञानासंबंधात विविध चाचण्या घेणे.
२०. कृषि पणन मंडळातील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षित करणे.
२१. कृषि निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणे.

२२. हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर मध्ये पूर्ण क्षमतेने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच नव नविन पिकांबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

२३. उत्पादक ते ग्राहक कृषि माल विक्री योजना कार्यान्वीत करुन तिचा प्रचार आणि प्रसार करणे

२४. कृषि पणनाशी संबंधीत विषयावर माहिती पुस्तिका तयार करणे.

२५. राज्यातील बाजार समित्यांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.

२६. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि विपणनाच्या सुविधा निर्माण करणे.

२७. नक्षलग्रस्त भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सोयी सुविधांची उभारणी करणे.

२८. कृषि मालाचे ब्रँण्ड विकसित करणे.

२९. राष्ट्रीय कृषी बाजार (ENAM) प्रकल्पात राज्यातील बाजार समित्यांचा समावेश करणे.

३०. कृषि उत्पन्न बाजार समित्यांसाठी कॉमन अकौंटिंग सिस्टिमचा वापर करणे.

३१. उत्पादक ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत " शेतकरी आठवडे बाजार " योजनेची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करणे.

३२. शेतकरी उत्पादक कंपन्यांना सल्ला सेवा, मदत, मार्गदर्शन करणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल विक्री व्यवस्थेसाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे मजबूतीकरण करणे.

३३. आंतरराज्य व्यापार वृध्दीसाठी प्रयत्न करणे या अंतर्गत राज्यातील शेतीमाल शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून इतर राज्यात विक्री करणे तसेच इतर राज्यातील शेतीमाल विना मध्यस्त आपल्या राज्यात विक्रीसाठी आणणे.

३४. निर्यातदार आणि शेतकरी / गट / कंपन्या यांचे सांगड घालून निर्यातीला प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.

३५. निर्यातीस चालना देण्यासाठी " हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग प्रोग्राम " आयोजित करुन निर्यातदार तयार करणे.

३६. निआम - जयपूर, मॅनेज – हैद्राबाद, आय.आय. एफ.टी. – नवी दिल्ली, डी.एम.आय.,वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ को-ऑप मॅनेजमेंट, आय.सी.एम., पुणे यांच्या मदतीने विविध प्रशिक्षण, कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच त्यांचे मार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्या तसेच कृषि पणन मंडळाचे अधिकारी पाठविणे.

## २. संचालक मंडळ

| अ.क्र. | संचालकाचे नाव व पदनाम |
|---|---|
| १. | **मा.ना.श्री.सुभाष सुरेशचंद्र देशमुख**<br>**मंत्री, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग,**<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई –३२. तथा<br>मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ., पुणे |
| २. | **मा.ना.श्री.सदाशिव रामचंद्र खोत**<br>**राज्यमंत्री, कृषि,फलोत्पादन व पणन .**<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ तथा<br>मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ.,पुणे. |
| ३. | **मा.श्री.दिलिपराव मोहिते,**<br>**सभापती,** महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या., पुणे तथा<br>**मा.सदस्य,** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ४. | **मा.श्री.विजय झाडे, भा.प्र.से (दि. २१/०९/२०१८ पर्यत)**<br>**मा.श्री.सतिश सोनी, (दि.२१/०९/२०१८ पासून)**<br>**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**<br>**महाराष्ट्र राज्य, पुणे.** |
| ५. | **मा.चिफ जनरल मॅनेजर,**<br>**नाबार्ड प्रतिनिधी, पुणे.** |
| ६. | **मा.श्री. सचिंद्र प्रताप सिंह, भा.प्र.से (दि.०७/०२/२०१९ पर्यत)**<br>**मा.श्री.सुहास दिवसे, भा.प्र.से (दि.०८/०२/२०१९ पासून)**<br>**आयुक्त, (कृषि)**<br>**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.** |
| ७. | **मा.श्री.भवेश कुमार जोशी, (दि.१६/८/२०१८ पर्यत)**<br>**उपकृषि पणन सल्लागार**, प्रादेशिक कार्यालय, मुंबई.<br>**मा.श्री.गजेंद्र सिंग (दि.१६/०८/२०१८ पासून)**<br>**सहाय्यक उपकृषि पणन सल्लागार**, प्रादेशिक कार्यालय, मुंबई. |
| ८. | **मा.श्री.मोहन उत्तमराव इंगळे,**<br>**सभापती**, कृषि उत्पन्न बाजार समिती, धामणगाव, जि.अमरावती तथा<br>**मा.सदस्य**, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ९. | **मा.श्री.नारायण बाजीराव पाटील**<br>**सभापती**, कृषि उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचा, जि.धुळे<br>**मा.सदस्य**, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |

| अ.क्र. | संचालकाचे नाव व पदनाम |
|---|---|
| १०. | **मा.भाऊसाहेब भगवान गायकवाड**<br>**सभापती,** कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी,जि.सांगली<br>**मा.सदस्य,** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ११. | **मा.श्री.रूपचंद रामकृष्णजी कडू**<br>**सभापती,** कृषि उत्पन्न बाजार समिती, उमरेड, जि.नागपूर<br>**मा.सदस्य,** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १२. | **मा.डॉ.आनंद जोगदंड (दि.१९/०९/२०१८ पर्यत)**<br>**मा.श्री.डी.आर.तावरे, भा.प्र.से (दि.१९/०९/२०१८ ते दि.२७/०२/२०१९ पर्यत)**<br>**मा.डॉ.किशोर तोष्णीवाल (दि.२७/०२/२०१९ पासून)**<br>**पणन संचालक,महाराष्ट् राज्य,पुणे**<br>**मा.सदस्य,** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १३. | **मा.श्री.सुनिल पवार**<br>**कार्यकारी संचालक,**<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे तथा सदस्य सचिव |

# ३. व्यवस्थापन

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुनिल गो. पवार (प्रतिनियुक्ती) | - | कार्यकारी संचालक |
| २. | श्री. दिपक डी.शिंदे (प्रतिनियुक्ती ) | - | सरव्यवस्थापक |
| ३. | श्री. डी.डी.देशमुख, उपसरव्यवस्थापक- अभियांत्रिकी | -- | अभियांत्रिकी |
| ४. | डॉ. बी.एन.पाटील - उपसरव्यवस्थापक | - | निर्यात सेल / व्ही. एच. टी. वाशी |
| ५. | श्री. एम.ई.कदम सहाय्यक सरव्यवस्थापक, | | कृषि व्यापार विकास |
| ६. | श्री. ए.पी.पाटील, व्यवस्थापक | | जनसंपर्क व प्रसिध्दी |
| ७. | श्री. एम.एल.लोखंडे, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | संगणक |
| ८. | श्री. एम.पी.पवार, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | प्रकल्प/बीडीपी |
| ९. | श्री. डी.एस पाटील, व्यवस्थापक | - | प्रशासन |
| १०. | श्री. जयंत कोकणे, व्यवस्थापक, | --- | वित्त व लेखा |
| ११. | श्री. एस.पी.बाजारे, व्यवस्थापक | -- | रा.कृ.वि.यो.- अभियांत्रिकी, मालमत्ता |
| १२. | श्री. बी.जी.कातोरे, व्यवस्थापक | - | बाजार समिती |
| १३. | श्री. ए.ए.औताडे, व्यवस्थापक | -- | शेतमाल तारण योजना(बा.स.) |
| १४. | श्री. के.एस. फटांगरे , व्यवस्थापक | - | संगणक (हार्डवेअर) |
| १५. | श्री.व्ही .व्ही.जगदाळे, व्यवस्थापक | - | संगणक (डेटाबेस) |
| १६. | श्री. टी.एस.नांगरे, व्यवस्थापक | --- | शेती (तळेगाव) |
| १७. | श्रीमती एस.ए.तांभाळे, विधी अधिकारी<br>श्री. व्ही.जे.राणे,विधी अधिकारी | दि.३०/०४/२०१८ पर्यत<br>दि.०१/०५/२०१८ पासून | विधी अधिकारी |

## विभागीय उपसरव्यवस्थापक/ विभागीय सहायक सरव्यवस्थापक / विभागीय व्यवस्थापक

| क्र. | विभाग प्रमुखाचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अशोक एस गार्डी, उपसरव्यवस्थापक<br>श्री. एस.एस.घुले,(उपसरव्यवस्थापक-अतिरिक्त पदभार)<br>श्री. पी.बी.सुर्यवंशी,उपसरव्यवस्थापक | दि.२८/०५/२०१८ पर्यत<br>दि.१८/०६/२०१८ पर्यत<br>दि.१८/०६/२०१८ पासून | पुणे |
| २. | श्री. डी.डी.आहेर, उपसरव्यवस्थापक<br>श्री. जे.एस.आहेर, उपसरव्यवस्थापक | दि.१५/०६/२०१८ पर्यत<br>दि.१५/०६/२०१८ पासून | नाशिक |
| ३. | कु. शुभांगी सं. गोंड, उपसरव्यवस्थापक | -- | लातूर |
| ४. | श्री. एल.बी.मुंदडा, उपसरव्यवस्थापक | -- | अमरावती |
| ५. | डॉ. बी.एन.पाटील, उपसरव्यवस्थापक | -- | रत्नागिरी |
| ६. | श्री. ए.जे.पवार, (उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार)<br>श्री. एस.एस.घुले, उपसरव्यवस्थापक | २५/०६/२०१८ पर्यत<br>२५/०६/२०१८ पासून | कोल्हापूर |
| ७. | श्री. एम. एन. साळुंके पाटील, उपसरव्यवस्थापक<br>श्री. जी.सी.वाघ (उपसरव्यवस्थापक-अतिरिक्त पदभार) | दि.२८/०५/२०१८ पर्यत<br>दि.२८/०५/२०१८ पासून | औरंगाबाद |
| ८. | श्री. एम.एस.गवळे<br>(उपसरव्यवस्थापक-अतिरिक्त पदभार) | -- | नागपूर |

# ४. वित्तीय स्थिती

## उत्पन्नाची साधने

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम क्र. ३९(ल) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पन्नाची साधने ही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून जमा होणारे वार्षिक अंशदान, कर्जावरील व्याज, गुंतवणूकीवरील व्याज, निर्यात सुविधा केंद्रे व इतर उत्पन्न ही आहेत.

सदरच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून कृषि पणन मंडळाच्या आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च व इतर विकासात्मक कामांबाबतचा खर्च भागवून उर्वरीत रक्कम बाजार समित्यांना विकासात्मक कामांसाठी निधी म्हणून देण्याची तरतूद वरील कायदा कलम ३९(ल)(३) मध्ये नमुद केली आहे. त्यानुसार दिनांक ३१/०३/२०१९ अखेर कृषि पणन मंडळास प्राप्त झालेले उत्पन्न व त्याचा विनियोग याबाबतची माहिती खालीलप्रमाणे;

### ताळेबंद — २०१८-२०१९

(रु. कोटीत)

| अ.क्र | देयता | रक्कम रु. | संपत्ती | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मार्केटिंग फंड | ४४६.७२ | स्थावर मालमत्ता | २४६.२८ |
| २ | बँक ओव्हरड्राफ्ट | ००.०० | गुंतवणूक | २७८.१७ |
| ३ | चालु देयता | ४०.९८ | बँकेतील शिल्लक | ३९.१६ |
| ४ | अनुदान ( अपेडा व इतर) | १५२.३४ | अखेरच्या मालाचा साठा | ००.०१ |
| ५ | मार्केटिंग एक्सटेन्शन फंड | ०७.३३ | कर्ज व अग्रिम | १३.६५ |
| ६ | कांदा निर्यात डेव्हलपमेंट एक्सटेंशन फंड | ४८.४७ | आयकर | ००.८१ |
| ७ | आर.के.व्ही.वाय. अनुदान | ०४.२३ | चालु देयता | १५३.५१ |
| ८ | तरतूद | ३१.५१ | | |
| | **एकूण** | **७३१.५८** | **एकूण** | **७३१.५८** |

### उत्पन्न व खर्च — २०१८-२०१९

(रु. कोटीत)

| अ.क्र. | खर्च | रक्कम रु. | उत्पन्न | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | १५.५० | बाजार समिती कर्जावरील व्याज | ०४.८७ |
| २ | प्रशासकीय खर्च | ०६.९५ | गुंतवणुकीवरील व्याज | १७.२८ |
| ३ | निर्यातवृध्दी | ००.२८ | प्रकल्प सल्ला विभाग | ००.०१ |
| ४ | विकास व प्रकल्प | ००.९१ | निर्यात सुविधा केंद्रे उत्पन्न | ०२.५७ |
| ५ | घसारा | २१.१६ | कृषि पणन मित्र वर्गणी | ००.२९ |
| ६ | तरतूद | ०० | इतर उत्पन्न | ०१.८० |
| | | | तुट | १७.९८ |
| | **एकूण** | **४४.८०** | **एकूण** | **४४.८०** |

मंडळाचे अतिरिक्त निधी शासकीय व शेड्युल्ड बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणुकीवरील व्याजाचे उत्पन्न सरासरी ६.७५ टक्के दराने मिळाले असून अहवाल वर्षातील भांडवली बाजारातील व्याजदर ५.५० टक्के ते ७.७५ टक्के विचारात घेता मिळालेले उत्पन्न निश्चित चांगले आहे.

**लेखे तपासणी**

पणन मंडळाचे वैधानिक लेखा परिक्षण मार्च २०१५-२०१६ अखेर व अंतर्गत लेखापरिक्षण व कर लेखा परिक्षण मार्च २०१९ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

## सन २०१९-२०२० अर्थसंकल्प - उत्पन्न

(रु.कोटीत)


| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंशदान | ४५.०० | ३२.०८ |
| २ | कर्ज वसुली | ४५.०० | ३२.०८ |
| ३ | कर्जावरील व्याज (बा.स. व इतर) | १०.०० | ०७.१३ |
| ४ | गुंतवणुकीवरील व्याज | १९.०० | १३.५४ |
| ५ | मुदत ठेवीवरील कर्ज | १०.०० | ०७.१३ |
| ६ | निर्यात सुविधा केंद्र उत्पन्न | ०६.५८ | ०४.६९ |
| ७ | अनुदान (आर.के.व्ही.वाय., अपेडा व इतर ) | ००.०० | ००.०० |
| ८ | इतर उत्पन्न | ०४.७१ | ०३.३६ |
| | **एकूण** | **१४०.२९** | **१००** |

## सन २०१९-२०२० अर्थसंकल्प – विनियोग


(रु. कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाजार समिती कर्ज वाटप व अनुदान वाटप | ८५.२० | ३५.०५ |
| २ | आस्थापना, प्रशासकीय व इतर खर्च | ३३.६७ | १३.८५ |
| ३ | मुदत ठेवींवरील कर्ज, घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम | १२.०३ | ०४.९५ |
| ४ | भांडवली खर्च (मुख्यालय, निर्यात सुविधा केंद्रे व इतर) | १०४.८४ | ४३.१३ |
| ५ | निर्यात प्रमोशन व विकास व प्रकल्प | ०७.३३ | ०३.०२ |
| | **एकूण** | **२४३.०७** | **१००** |

## सन २०१९-२०२० अर्थसंकल्प – उत्पन्न




## सन २०१९-२०२० अर्थसंकल्प – विनियोग



# ५. इतर विभाग

## अ ) बाजार समिती विभाग

दि. १ एप्रिल २०१८ ते दि. ३१ मार्च २०१९ या अहवाल वर्षात राज्यात एकुण ३०६ बाजार समित्या व ५९८ उपबाजार कार्यरत आहेत. बाजार समित्या राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. राज्यातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे;

| अ. क्र. | विभाग | मुख्य बाजार | उपबाजार |
|---|---|---|---|
| १) | रत्नागिरी | २० | ४१ |
| २) | नाशिक | ५३ | ११७ |
| ३) | पुणे | २२ | ६८ |
| ४) | औरंगाबाद | ३६ | ६५ |
| ५) | लातूर | ४९ | ८० |
| ६) | अमरावती | ५५ | ९१ |
| ७) | नागपूर | ५० | ७६ |
| ८) | कोल्हापूर | २१ | ६० |
| | **एकूण** | **३०६** | **५९८** |

### १) अंशदान

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७(२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण ३०३ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली.

(रु.लाखात)

| दि.३१/०३/२०१७ अखेर थकीत रु. | सन २०१७-१८ ची अंशदान मागणी रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. | वसूल रक्कम रु. | येणेबाकी रु. |
|---|---|---|---|---|
| **१०६८.८४** | **३९१७.६१** | **४९८६.४५** | **३४६४.३४** | **१५२२.११** |

### २) कर्ज

**विकासात्मक कर्ज**

कृषि पणन मंडळामार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे (अर्थसहाय्य) म्हणून मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने जमीन खरेदी, जमीन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यावर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, शेतकरी बाजार, कांदा चाळ बांधकाम तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामांचा समावेश होतो.

अहवाल वर्षात एकूण ०६ कृषि उत्पन्न बाजार समित्यांना विविध विकासात्मक कामे करण्यासाठी एकूण रक्कम रु.४,५७,८५,४७३/- इतके कर्ज ६ टक्के व्याजदराने वितरित करण्यात आलेले आहे.

**मुदती कर्ज**

| अ. क्र. | बाजार समितीचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | पुसद, जि. यवतमाळ | ३०/०६/२०१८ | ८००५९४ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विविध विकासकामे. |
| २ | आष्टी, जि. वर्धा | ०५/०९/२०१८ | १४८३०७६ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत उपबाजार कारंजा (घा.) व तळेगांव येथे विविध विकासकामे. |
| ३ | पारोळा, जि. जळगांव | २९/०९/२०१८ | ६०००००० | एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विविध विकासकामे. |
| ४ | तासगांव, जि. सांगली | २५/१०२०१८ | ३००००००० | (१ ला हप्ता) नविन विस्तारीत बेदाणा व शेतीमाल मार्केट उभारणीकरीता. |
| ५ | जिंतूर, जि. परभणी | २६/१०/२०१८ | २३६६५२१ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विविध विकासकामे. |
| ६ | मूल, जि. चंद्रपूर | १३/११/२०१८ | ५१३५२८२ | एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विविध विकासकामे. |
| | **एकुण** | | **४५७८५४७३** | |

**कर्ज व्याजदर -** दि.९/३/२०१६ चे परिपत्रकान्वये राज्यातील सर्व बाजार समित्यांसाठी विविध विकसन कामांसाठी देण्यात येणाऱ्या दिर्घ व अल्प मुदती कर्जावर ६ टक्के सवलतीचा व्याजदर लागू करण्यात आलेला आहे.

## ३) अर्थसंकल्प मंजुरी

अहवाल वर्षात महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३८ आणि त्याखालील नियमातील संबंधित नियमान्वये २८७ बाजार समित्यांचे सन २०१९-२० चे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे १४८ बाजार समित्यांचे सन २०१८-१९ चे पुरवणी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आले. तसेच सन २०१७-१८ चे ८१ बाजार समित्यांचे पुर्नविनियोजन पत्रके मंजूर करण्यात आली.

### ४) थेट पणन अंतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील खरेदीवरील बाजार फी बाबत

महाराष्ट्र शासनाकडील दि.५ जानेवारी २००४ चे आदेशानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन आय.टी.सी.लि., कारगील इंडिया प्रा.लि., मेगासेव प्रा.लि., रिलायन्स फ्रेश लि., राधाकृष्ण फुडलँड प्रा.लि., आदित्य बिर्ला क्वाडरँगल ट्रेडिंग सर्व्हिसेस, महा. कंझ्युमर फेडरेशन, महिंद्रा शुभ लाभ या कंपन्यांना उक्त अधिनियमातील कलम ७ मधून सुट देऊन महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आवाराबाहेर शेतमालाची थेट खरेदी करण्यासाठी काही अटींस अधीन शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वरील कंपन्यांकडून शेतमालाची मोठ्या प्रमाणात खरेदी चालू आहे. थेट पणन अंतर्गत राज्यात एकुण १०६६ कंपन्यांना पणन संचालनालयामार्फत परवाना देण्यात आलेला आहे. थेट पणन परवाना प्राप्त धारकांना कृषि पणन मंडळाकडे बाजार फी भरावी लागते. त्यानुसार अनुज्ञप्ती धारक कंपन्यानी दि. ०१/०४/२०१८ ते दि. ०८/१०/२०१८ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीमालावरील कृषि पणन मंडळाकडे जमा बाजार फी रक्कम रु.६३,२१,१८९/- संबंधित बाजार समित्यांचे बँक खात्यावर NEFT व RTGS द्वारे वर्ग करण्यात आली आहे.

## ब) निर्यात विभाग

राज्यातील कृषि मालाची निर्यात वाढावी व त्यासाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरीता विविध कार्यशाळेच्या माध्यमातुन शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यासाठी कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ.साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशिल आहे.

**निर्यात वृध्दीकरीता पायाभूत सुविधांची उभारणी**

राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब व फुले या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब या कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी राज्यात खालीलप्रमाणे पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली आहे.

**निर्यात सुविधा केंद्राचा प्रकार व संख्या तपशील**

| अ.क्र. | सुविधा | संख्या |
|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र | २१ |
| २. | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र | २० |
| ३. | फुले निर्यात सुविधा केंद्र | ३ |
| | **एकुण** | **४४** |

**विभागनिहाय निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील**

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| पुणे | १ | शेतमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर ता. इंदापुर जि. पुणे | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड ता.इंदापुर, जि.पुणे | हाताळणी यंत्रणा | १० मे. टन / तास | २०० केळी |
| | | | | कांदा साठवणूक सुविधा | ५०० मे. टन | |
| | | | | निर्यातदार गाळे - ३६० स्के.मी. | | |
| | | | | प्रशासकीय इमारत - २३३ स्के.मी. | | |
| | २ | फळे व भाजीपाला सुविधा | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे | कोल्ड स्टोरेज | ३ x ४० मे. टन | १४० डाळींब व केळी |
| | | | | प्रिकुलिंग | ५ मे. टन/बॅच | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | **प्रक्रिया मे.टन** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | केंद्र,इंदापुर ता. इंदापुर जि. पुणे | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | आईस मेकींग युनीट | | आईस स्टोरेज | ४० मे. टन | |
| | | | | आईस टँक | ५ मे. टन /दिवस | |
| | ३ | केळी निर्यात सुविधा केंद्र इंदापूर जि.पुणे | कृषि उत्पन्न बाजार समिती, इंदापुर, मुख्य बाजार, इंदापुर-अकलुज रोड, शिवलिला मार्केट, ता. इंदापुर, जि. पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | --- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ४ x २५ मे. टन | |
| | | | | दोन पॅकहाऊस (वालचंदनगर व अकलुज) | ४८८५ स्क्वे. फुट प्रत्येकी | |
| | | | | डि.जी. सेट | १७५ KVA | |
| | ४ | द्राक्षे व डांळिब निर्यात सुविधा केंद्र, बारामती जि.पुणे | जळोची, ता बारामती जि.पुणे, | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ७३७.९२ आबा/डाळिंब २०.०१ |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे. टन | |
| | | | | पॅक हाउस | ४०३५ स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | ५ | फुले निर्यात सुविधा केंद्र तळेगांव (दा) ता.मावळ जि.पुणे | महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (फ्लोरीकल्चर पार्क) जोग सेंटर - मुंबई - पुणे रोड, वाकडेवाडी एमआयडीसी, तळेगाव,जि.पुणे | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | ३६२.७ गुलाब फुले |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | २०० KVA | |
| | ६ | निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव ता. मावळ, जि.पुणे. | हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ९० कांदा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाउस | ८०० स्क्वे. फुट | |
| **कोल्हापूर** | ७ | डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र आटपाडी जि. सांगली | कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | १००.४ डाळींब |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | २००० स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | २०० KVA | |
| | ८ | फुले निर्यात | अजिंक्यतारा | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | -- |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | सुविधा केंद्र- सातारा, जि. सातारा | शेतकरी सहकारी फळे, फुले व भाजीपाला खरेदी विक्री संस्था मर्या. ता. सातारा जि.सातारा | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| रत्नागिरी | ९ | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे जि.रत्नागिरी | शांतीनगर, नाचणे रोड, ता. जि. रत्नागिरी | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ६२.१७ आंबा व नारळ |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ८०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १० | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ३५.६७ आंबा व आंबा पल्प |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ९०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | ११ | विकीरण सुविधा केंद्र वाशी नवी मुंबई. | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | रॅडिएशन सोर्स | कोबाल्ट ६० | २२२९.६७ आंबा, डाळिंब, मसाले पदार्थ ड्रायफ्रुट, पशुखाद्य, |
| | | | | सोर्स तिव्रता | ५०० कि.क्युरी | |
| | | | | रॅडिएशन युनिट (आंबा) | ५ मे. टन / तास | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ७६ मे.टन | |
| | | | | डि.जी.सेट | ५०० KVA | |
| | | | | ट्रान्सरफॉर्मर | ५०० KVA | |
| | १२ | भाजीपाला प्रक्रिया केंद्र वाशी, नवी मुंबई. | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | प्रिकुलिंग | ५ मे.टन / तास | २४३२.४३८ फळे व भाजीपाला |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ९८ मे.टन | |
| | १३ | व्हेपर हीट ट्रीटमेंट, वाशी, नवी मुंबई (व्ही.एच.टी.) | निर्यात भवन, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती,भाजीपाला बाजार आवार, सेक्टर नं.२१,वाशी, मुंबई. | व्हि.एच.टी. मशिन | १.५ मे.टन / बॅच | २२३३.६९२ फळे व भाजीपाला |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाउस | ४००० स्के.फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ४३२ नग | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अॅल्युमिनीअम पॅलेट | १२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ५०० KVA | |
| नाशिक | १४ | कांदा, द्राक्ष व डाळिब निर्यात सुविधा केंद्र, कळवण ता. कळवण जि. नाशिक | मु.पो.भेंडी, ता. कळवण जि. नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | कांदा ५५३ |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४३५० स्के.मी. X २ | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | कांदा साठवणूक | ८ x ५० मे.टन | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १६० KVA | |
| | १५ | कांदा निर्यात सुविधा केंद्र चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदवड मौजे. चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ११० कांदा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ४७६५ क्स्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | कांदा चाळ | ३५० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ५०० नग | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १६ | फुले निर्यात सुविधा केंद्र मोहाडी ता.दिंडोरी जि.नाशिक | कृषि उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी, उपबाजार आवार, मोहाडी, गट नं-१२८६ ता. दिंडोरी,जि.नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच x २ | ३८६१.६७ द्राक्षे |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | २०० KVA | |
| | १७ | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा. ता.रावेर जि.जळगाव | कृषि उत्पन्न बाजार समिती रावेर ता.रावेर जि.जळगाव | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | १२०२.६ केळी |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १८ | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र खडकेवाके | मौजे- खडकेवाके, ता.राहाता, जि. अहमदनगर | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ---- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६९६४ स्क्वे.फुट | |
| | | | | हॅंडलिंग लाईन | २ मे.टन / तास | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ता.राहता जि.अहमदनगर | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| औरंगाबाद | १९ | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना ता. जालना, जि.जालना | कृषी उत्पन्न बाजार समिती जालना मार्केट यार्ड, जालना, जि.जालना | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ---- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ३७२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २० | केळी निर्यात सुविधा केंद्र , वसमत ता.वसमत जि. हिंगोली | गट नं.१६७, तालुका बीज गुणन केंद्र, ता.वसमत, जि. हिंगोली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ---- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन/बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| लातूर | २१ | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र बीड ता.जि. बीड | कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, ग्रामपंचायत बहीरवाडी, ता. बीड जि. बीड. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ७२.४ सफरचंद |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | १० मे.टन | |
| | | | | पॅक हाऊस | ३८७५ स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २२ | आंबा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, लातुर. ता.जि.लातूर | एमआयडीसी, लातूर प्लॉट क्रमांक डी -१ / १ न्यू एमआयडीसी, वेअरहाऊस गोडाऊन, बार्शी रोड जवळ ता.जि.लातूर | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ३४० कोथींबीर, पपई, टरबुज ,लिंबु |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट | १००० नग | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | २५० KVA | |
| अमरावती | २३ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र वरुड ता. वरुड जि. | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि शेती माल प्रक्रिया, पणन सहकारी संस्था मर्या. वरुड ता. | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ४० संत्रा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | ग्रेडिंग लाईन | २ मे.टन/ तास | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA, | |
| | | | | | ३० KVA | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अमरावती | वरुड जि. अमरावती | ट्रान्स फॉर्मर | १६० KVA | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| नागपूर | २४ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा ). ता. कारंजा घाडगे जि. वर्धा | कारंजा घाडगे ता.कारंजा घाडगे जि.वर्धा | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ७१२ संत्रा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन | |
| | | | | पॅकहाऊस | ३३०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वॅक्सिंग युनिट | | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट | ७००० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |

## फळे व भाजीपाल्याकरिता आधुनिक सुविधा केंद्र (२०)

| विभागाचे नाव | सुविधा केंद्राचे नाव | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | प्रक्रीया तपशील मे.टन |
|---|---|---|---|
| **पुणे विभाग** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, शेलपिंपळगाव, ता.खेड,जि.पुणे | | २५०.९९ बटाटा |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | कोल्ड स्टोरेज - २५ एमटी | ० |
| **कोल्हापूर** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, मसूर, ता.कराड,जि.सातारा | प्रिकुलींग- ५ मे.टन / बॅच | १९५ बेबीकॉर्न |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, म्हसवड, ता. माण, जि.सातारा | पॅक हाऊस क्षेत्र १०७.३० | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | क्यु. मीटर ११५५ चौ. फूट. | ---- |
| **रत्नागिरी** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पालघर, ता. पालघर जि.ठाणे | डीजी सेट -१०० किलोवॅट | ---- |
| **नाशिक** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, ठाणगाव, ता.सिन्नर, जि.नाशिक | अँटी रूम- ४२ क्यु. मीटर | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, लोणी, ता.राहाता,जि.अ.नगर | प्लांट रूम - ३ ९ क्यु. मीटर | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, शिरपूर, ता. शिरपूर जि.धुळे | कार्यालय - ३२ क्यु. मीटर | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पाडळसा , ता. यावल जि.जळगाव | स्टोअर रूम -१७.३० क्यु. | ---- |
| **औरंगाबाद** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, करमाड,ता. जि.औरंगाबाद | मीटर इनपुट दुकान - ३.५४ | २७५ डाळींब |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, तिर्थपुरी ता. घनसावंगी, जि.जालना | सीयू मीटर | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, कळमनुरी, ता. कळमनुरी, जि.हिंगोली | अंतर्गत रस्ता कंपाउंड भिंत, | ४९ टोमॅटो, हळद |

| | | | |
|---|---|---|---|
| **अमरावती** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, चांदूररेल्वे, ता. चादुंररेल्वे, जि.अमरावती | बाह्य विद्युतीकरण, प्लॅस्टिक क्रेट | १७३.२ भाजीपाला, मिरची, भेंडी |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि.बुलढाणा | | ---- |
| **लातूर** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि.नांदेड | | १७९५ केळी |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, माजलगाव, ता. माजलगाव, जि.बीड | | ---- |
| **नागपूर** | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, भिवापूर, ता. भिवापूर, जि.नागपूर | | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, मोहाडी, ता.मोहाडी, जि.भंडारा | | ---- |
| | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पुलगाव, ता.देवळी, जि.वर्धा | | ---- |

**१) भाजीपाला प्रक्रीया केंद्र (VPF), वाशी**

युरोपियन युनियनने भारतातुन आयात होणाऱ्या आंबा व पाच भाजीपाल्यावर आयात बंदी केली आहे. या पार्श्वभुमीवर कृषी पणन मंडळाने पुढाकार घेउन अपेडा यांच्या सहकार्याने व कृषि उत्पन्न बाजार समिती मुंबई यांच्या जागेवर वाशी येथे कृषि पणन मंडळामार्फत भाजीपाला प्रक्रीया केंद्राची उभारणी करणेत आली आहे. सदरील सुविधेवर आंबा, भेंडी, मिरची, कारले, वांगी व इतर भाजीपाला यावर हॉट वॉटर प्रक्रिया करण्यात येते. तसेच सदरील सुविधेवर प्रिकुलींग व कोल्डस्टोरेजची सुविधा देखील उभारण्यात आली आहे. सदर सुविधा वाशी येथे असल्याने ही सुविधा युरोपियन देशांमध्ये भाजीपाला निर्यात वृध्दीसाठी विशेष महत्वाची ठरली आहे. तसेच या सुविधेवर अमेरीका येथे आंबा निर्यातीकरीता आवश्यक असलेली हॉट वॉटर प्रक्रिया देखील करुन देण्यात येते. सदर सुविधेचा वापर विवीध खाजगी निर्यातदार, शेतकरी कंपनी, सहकारी संस्था यांच्यामार्फत केला जातो.

**२) विकीरण सुविधा केंद्र वाशी, नवी मुंबई**

तब्बल १८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर सन २००६ मध्ये अमेरीकन बाजारपेठ भारतीय आंब्यासाठी खुली झाली होती. परंतु त्यासाठी प्राथमिक अट ही आंबा विकिरण प्रक्रीया करुन पाठवणे अशी होती. त्यासाठी पणन मंडळामार्फत बी.ए.आर.सी.च्या मालकीची कृषक विकिरण सुविधा वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर नव्हती. त्यामुळे निर्यातदारांच्या मागणीनुसार व अपेडाच्या मार्गदर्शनाने कृषि पणन मंडळामार्फत मोठ्या क्षमतेच्या विकिरण सुविधेची उभारणी वाशी , नवि मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत:चा अतिरिक्त निधी वापरुन सुविधा उभारणेचे कामकाज पुर्ण झाले असुन AERB व DAE चे प्रमाणीकरण पुर्ण झाले आहे. तसेच सन २०१६ मध्ये सुविधेस यु.एस.डी.ए. यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर सुविधेवरुन दि. १६ एप्रिल २०१६ रोजी अमेरीकन निरीक्षकांच्या उपस्थीतीत डाळींबाचे डोज मॅपींग करण्यात आले. या सुविधेवरून ऑस्ट्रेलिया या देशाला निर्यातीसाठी डाळींब प्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

**३) व्ही. एच. टी. सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई**

आंबा फळमाशी विरहित करण्यासाठी ही प्रक्रिया पध्दत अवलंबविली जाते. जपान, युरोपीयन देश, न्युझिलंड, मॉरिशस, साऊथ कोरीया इत्यादी देशांकडून आंबा आयाती पुर्वी सदर प्रक्रियाची मागणी केली जाते. पणन मंडळाने याकरीता १.५ मे. टन क्षमतेची व्ही. एच. टी. सुविधा वाशी, नवी मुंबई येथे उभी केली असून या द्वारे उपरोक्त देशांना प्रतिवर्षी सुमारे २५० मे. टन आंब्याची निर्यात करण्यात येते.

**पिकनिहाय कार्यशाळा/प्रशिक्षण/खरेदीदार विक्रेता संमेलन**

कृषि पणन मंडळामार्फत विभागनिहाय संपन्न झालेल्या फळे/भाजीपाला पिकांच्या कार्यशाळांचा तपशील -

| अ.क्र. | विभाग | विषय | दिनांक | कार्यशाळा ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | आंबा निर्यात | दि.३१.१०.२०१८ | प्रादेशीक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ला जि. सिंधुदुर्ग |
| २ | | आंबा निर्यात | दि.०२.११.२०१८ | अल्पबचत सभागृह रत्नागिरी |
| ३ | | विभागीय व्हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सचे पणन मंडळ व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन | दि. २५.०२.२०१९ ते ०१.०३.२०१९ | रत्नागिरी |
| ४ | | विभागीय व्हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सचे पणन मंडळ व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन | दि. ०४.०३.२०१९ ते ०२.०३.२०१९ | खोपोली जि. रायगड |
| ५ | | अपेडा व कृषि विभाग यांचे संयुक्त विद्यमाने खरेदीदार विक्रेता संमेलनाचे आयोजन | दि. २५.०२.२०१९ | वेंगुर्ला जि. रत्नागिरी |
| ६ | | अपेडा व कृषि विभाग यांचे संयुक्त विद्यमाने खरेदीदार विक्रेता संमेलनाचे आयोजन | दि. २७.०२.२०१९ | रत्नागिरी |
| ७ | औरंगाबाद | निर्यातक्षम डाळिंब उत्पादन व निर्यातवृद्धी | दि. १५.१२.२०१८ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, करमाड जि. औरंगाबाद |
| ८ | पुणे | निर्यातक्षम केळी उत्पादन व निर्यातवृद्धी | दि. ११.०१.२०१९ | कंदर ता. करमाळा जि. सोलापुर |
| ९ | कोल्हापूर | निर्यातक्षम केळी उत्पादन व निर्यातवृद्धी | दि.१८.०१.२०१९ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, तळसंदे जि. कोल्हापुर |
| १० | लातूर | निर्यातक्षम केळी उत्पादन व निर्यातवृद्धी | दि.२१.०२.२०१९ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापुर जि. नांदेड |
| ११ | अमरावती | फळे/भाजीपाला पिक कार्यशाळा | दि. २८.०३.२०१९ | कृषि उत्पन्न बाजार समिती , मंगळुरपीर जि. वाशीम |
| १२ | निर्यात विभाग | भारत सरकारचे कृषि निर्यात धोरण एकदिवशीय चर्चासत्र | दि.२.०२.१९ | वैकुंठभाई मेहता शासकीय विकास प्रबोधिनी , बाणेर , जि. पुणे |

| अ.क्र. | विभाग | विषय | दिनांक | कार्यशाळा ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १३ | | भारत सरकारचे कृषि निर्यात धोरण एकदिवशीय चर्चासत्र | दि.८.०३.१९ | यशदा ,पुणे |

**कृषि मालाच्या निर्यातीकरीता नव्याने खुल्या झालेल्या देशांकरीता समुद्रमार्गे वाहतुकीसाठी रु.३०,०००/- प्रति कंटेनर अनुदान देणेबाबत योजना.**

महाराष्ट्र राज्यातून कृषि मालाच्या निर्यातीस जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळावे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत सहकारी संस्था,शेतकरी,कंपनी,निर्यातदार, शेतकरी उत्पादक गट यांनी फळे व भाजीपाला ( द्राक्षे वगळुन) या कृषि मालाच्या समुद्रमार्गे केलेल्या थेट निर्यातीस आर्थिक सहाय्य देण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा प्रस्ताव विचारार्थ होता. याबाबत पणन मंडळाच्या मा. संचालक मंडळ सभा क्र. १३४ दि. २.०७.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी रुपये १ कोटी इतकी रक्कम राखुन ठेवावी असे ठरलेले आहे.

पणन मंडळाने कंटेनर भाड्यात सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी यांना अनुदान देण्याची सवलत दिल्यामुळे अशा संस्थांचा निर्यातीमध्ये सहभाग वाढेल अशी आशा असुन सदर योजना खालील तक्यात नमुद केलेल्या देशात व विहित केलेल्या कृषिमालाची समुद्रमार्गे निर्यात करतील अशा सहकारी संस्था / शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी,कंपनी,निर्यातदार, शेतकरी उत्पादक गट यांना रु. ३०,००० /- प्रति कंटेनर (२० फुटी / ४० फुटी ) अनुदान देणेत येईल, अनुदानाची महत्तम मर्यादा प्रति लाभार्थी रु. १.०० लाख प्रति वर्ष एवढी राहील. योजनेसाठी २०१८-१९ या वर्षात ( २ जुलै २०१८ ते ३० जुन २०१९) या कालावधीसाठी आर्थिक तरतुद एकुण रु. १ कोटी करण्यात आलेली आहे.

**निर्यातीकरीता देश व उत्पादने**

| अ.क्र | देश | उत्पादने |
|---|---|---|
| १. | अमेरीका | आंबा , डाळींब |
| २. | ऑस्ट्रेलिया | आंबा , डाळींब |
| ३. | साऊथ कोरीया | केळी ,आंबा |
| ४. | कजाकिस्तान via (Bandar Abbas Port) | आंबा |
| ५. | अफगाणिस्तान via (Bandar Abbas Port) | केळी व कांदा |
| ६. | इराण | केळी, संत्रा,आंबा |
| ७. | रशिया | केळी , आंबा |
| ८. | मॉरिशियस | कांदा, आंबा |
| ९. | लॅटव्हीया Via (Rega Port) | भाजीपाला व कांदा |

**योजनेच्या अटी व शर्तीः-**

- सहकारी संस्था ,शेतक-यांची उत्पादक कंपनी,शेतकरी,निर्यातदार,कंपनी,शेतकरी गट,फर्म यांनी समुद्रमार्गे कंटेनरद्वारे थेट निर्यात (Direct Export) करणे बंधनकारक राहील.
- या योजनेचा लाभ फक्त महाराष्ट्रातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी, निर्यातदार, कंपनी, शेतकरी गट, फर्म यांना देय राहील.

- लाभार्थींनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्जासोबत संबंधित कागदपत्रे तसेच ज्या पुरवठादार कंपनीकडून कंटेनर उपलब्ध केलेला आहे त्याचे देयक सादर करणे बंधनकारक राहील.
- सदर योजना ही निश्चित केलेले देश व शेतमालाच्या उत्पादनासाठीच लागू राहील.
- व्यापा-यांनी सहकारी संस्थांच्या मध्यमातून निर्यात केल्यास अनुदान देय होणार नाही.
- निर्यातदार संस्था निर्यात केलेल्या मालाची विक्री रक्कम प्राप्त झाल्यानंतरच योजनेकरीता अर्ज करु शकतील, जेणेकरुन गुणवत्तेअभावी मालाची विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास अशा प्रस्तावांना अनुदान देय होणार नाही.
- कृषि मालाचा नमुना पाठविण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
- अनुदान संपुर्णपणे नामंजूर, अंशत: मंजुरी अथवा पुर्णपणे मंजूर करण्याचे सर्व अधिकार मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे यांचे राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारास बंधनकारक राहील
- सदर योजना ही २ जुलै २०१८ ते ३०जून २०१९ या कालावधीत समुद्रमार्गे निर्यात केलेल्या कृषिमाल व देश यासाठी लागु राहील.

सदर योजनेसाठी अनुदान मागणी प्रस्तावासोबत खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

- विहीत नमुण्यात मागणी अर्ज
- ईनव्हाईस कॉपी
- शिपींग बिल
- कंटेनर फ्रेट रिसीट
- फॉरेन एक्स्चेंज जमा झालेबाबत बँकेचे प्रमाणपत्र अथवा बँक एन्ट्री पुरावा.

**राज्यातील प्रगतशील व इच्छूक शेतकरी, उद्योजक यांचेसाठी हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सचे आयोजन**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत निर्यातपूरक उपक्रमांमध्ये वाढ करावी हा विचार करून "हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्स" आयोजनास माहे डिसेंबर २०१५ पासुन सुरूवात करण्यात आलेली आहे. हा कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून तो प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजीत केला जातो. त्याचा कालावधी ५ दिवस आहे. संबंधित ट्रेनिंग चे प्रशिक्षण शुल्क निवास व्यवस्थेसह रू. १०,१४८/-, निवास व्यवस्थेशिवाय रू. ८,८५०/- व महिलांसाठी रू. ७,६७०/- (२५ टक्के सवलत) एवढ्या शुल्काची आकारणी करण्यात येत आहे. सन २०१८-१९ मधे १२ प्रशिक्षण सत्रांच्या माध्यमातून ३२३ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षीत करण्यात आले आहे.

**प्रशिक्षणामधे पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.**

- ताजी फळे व भाजीपाला निर्यात संधी व पणन मंडळाचे कार्य
- निर्यात प्रक्रिया, परवाने, नोंदणी व वीमा
- इनव्हॉईस, पॅकींग लिस्ट, इ. कागदपत्रांची तोंडओळख
- उत्पादनांचा अभ्यास, एच. एस. कोड, आंतरराष्ट्रीय परिस्थिती
- क्वालीटी पॅरॅमिटर्स, फायटो सॅनिटरी, ॲगमार्क स्टॅंडर्स, ट्रेसनेट, MRL/PHI
- पॅकींग, पॅकेजींग, एअर व सी शिपींग, CHA यांच्या जबाबदाऱ्या

- कृषिमालाची वाहतुक व पुरवठा यंत्रणा (स्थानिक, आंतरदेशीय)
- टर्मिनॉलॉजीज, UCPDC, बँकींग प्रक्रिया, पेमेंट रिस्क
- निर्यातदारांसाठी RKVY, APEDA, MEIS, शासनाच्या योजना
- निर्यातीसाठी प्रमाणपत्रे (GAP, Human Consumption etc.)
- सुविधा केंद्र गरज (IFC,VHT,HWIT,VPF,PC,CS,RC)
- फळ भाजीपाल्यावर विशेष प्रक्रिया पद्धती
- करार शेती व पणन कायद्यातील बदलामुळे पणन संधी

# प्रकल्प विभाग

## १) सल्ला सेवा

पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा देण्यात येतात. सहकारी संस्था, बाजार समित्या, खाजगी उद्योग यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन देणे. पणन संचालनालयाकडील प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय अहवाल देणे या सारख्या सेवा या अंतर्गत पुरविण्यात येतात. तसेच पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि.योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात.

प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु. २४० कोटी आहे.

## २) राज्यातील नियोजित प्रकल्प

अ. राष्ट्रीय कृषि विकास योजनें अंतर्गत खालीलप्रमाणे २ प्रस्ताव सादर करण्यात आले.

१. राज्यातील १०८ बाजार समितींमध्ये गोदाम उभारणी करणेबाबतचा रु. १०९.८३ कोटीचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला. सदरच्या प्रकल्पास मान्यता प्राप्त झाली असुन त्यास रु.४१.८६ कोटी अनुदान मंजुर करणेत आले.

२. राज्यातील ३१ बाजार समितींमध्ये धान्य चाळणी यंत्र उभारणीबाबतचा रु. २०.२१ कोटीचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला. सदरच्या प्रकल्पास मान्यता प्राप्त झाली असुन त्यास त्यास रु.५.०५ कोटी अनुदान मंजूर करणेत आले.

**ब. Trade Infrastructure for Export Scheme (TIES) अंतर्गत प्रकल्प सादर.**

वाणिज्य व उद्योग मंत्रालय, केंद्र शासनाच्या TIES योजनेत ५० टक्के अनुदान मिळणेकरिता राज्य शासनामार्फत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आले;

१. खेड व्हॅल्यू चेन, खेड, जि. रत्नागिरी - प्रकल्प किंमत रु. ११.४४ कोटी

२. फळे व भाजीपाला निर्यात, प्रक्रिया आणि ब्लास्ट फ्रिजींग केंद्र, वाळवा, जि. सांगली - प्रकल्प किंमत रु.२६.९८कोटी.

## ३) टर्मिनल मार्केट :

केंद्र शासनामार्फत सार्वजनिक व खाजगी भागीदारी संकल्पनेतून टर्मिनल मार्केटस मुंबई((ठाणे), नाशिक व नागपूर या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा अंदाजित प्रकल्प खर्च खालील प्रमाणे आहे;

| अ.क्र | टर्मिनल मार्केट | अंदाजीत खर्च रु.कोटी |
|---|---|---|
| १ | मुंबई( (ठाणे) | २००-२५० |
| २ | नाशिक | ६० |
| ३ | नागपूर | ७० |

राज्यात उभारण्यात येणा-या टर्मिनल मार्केटसच्या अंमलबजावणीकरिता मा. पणन मंत्री महोदयांचा अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन) हे नोडल ऑफिसर व राज्याचे पणन संचालक हे अतिरिक्त नोडल ऑफिसर म्हणून कामकाज पहात आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केट हे सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उभारण्यात येणार असून हब आणि स्पोक संकल्पनेवर चालविली जाणार आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केटस (Built Own and Operate) या धर्तीवर स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून निवडलेल्या खाजगी उद्योजकाकडून चालविले जाणार आहेत. टर्मिनल मार्केटकरिता राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातून प्रकल्प खर्चाच्या २५ ते ४० टक्के परंतु कमाल रु. ५० कोटी इतके अनुदान प्राप्त होऊ शकते.

# ड) अभियांत्रिकी विभाग

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे - कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, जल नि:सारण व्यवस्था व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची, त्या अनुषंगाने येणाऱ्या कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. तसेच कृषि पणन मंडळामार्फत पणन मंडळाच्या स्वनिधी अथवा शासकीय अनुदानातुन उभारण्यात आलेली / येत असलेली शेतीमाल हाताळणी व प्रक्रिया प्रकल्पांची स्थापत्य विषयक व अनुषंगिक तांत्रिक कामकाज अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

अहवाल वर्षामध्ये (२०१८-२०१९) अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :-

अ) अभियांत्रिकी विभागामार्फत खालिल १२ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्ताव त्रुटी पुर्तता प्रस्ताव / कर्ज विनियोग दाखल प्रस्तावांची तांत्रिक छाननी करण्यात आलेली आहे ;

(१) हिंगणघाट, जि.वर्धा (२) तिरोडा, जि.गोंदिया (३) गोंदिया, जि.गोंदिया (४) धामण गाव रेल्वे, जि.अमरावती (५) चांदवड, जि.नाशिक ( ६) केज, जि.बीड (७) लासलगाव, जि नाशिक (८) शेगाव, जि.बुलढाणा (९) तुमसर, जि. भंडारा (१०) उल्हासनगर, जि.ठाणे (११) तासगाव, जि.सांगली (१२) इंदापुर, जि.पुणे

**ब) निर्यात सुविधा केंद्राची उभारणी**

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प किंमत (रु. लाख) (जीएसटी व्यतीरीक्त) | प्रकल्पाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १ | आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, जामगे, ता.खेड जि.रत्नागिरी | ८९२.२८ | काम प्रगतीपथावर. |

**क ) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत व ई-नाम योजने अंतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अंमलबजावणी बाबत कार्यवाही.**

**१) कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर यांचा पायाभूत सुविधा विकास प्रकल्प**

कृषि उत्पन बाजार समिती, कर्जत जि अहमदनगर या .बाजार समितीच्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पास दि .१५/१२/२०१७ रोजीच्या रा.कृ.वि.यो. च्या २४ व्या SLSC बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे;

(रुपये कोटी)

| **कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर पायाभूत सुविधा विकास प्रकल्प** | **एकुण अंदाजीत खर्च** | **रा.कृ.वि.यो. अनुदान** | **बा. स. ची स्वनिधी गुंतवणुक** | **वित्तीय संस्था/ कृषि पणन मंडळाचे कर्ज** |
|---|---|---|---|---|
| | १००% | २५% | २२% | ५३ % |
| रा.कृ.वि.यो. अंतर्गत कर्जत बाजार समिती मुख्य बाजार कर्जत व उपबाजार राशीन व मिरजगाव येथील विविध विकास कामे | २.४६ | ०.६२ | ०.५४ | १.३० |

सदर प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या विविध प्रशासकीय मंजुरी संदर्भात कार्यवाही व पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

**२) कृषि उत्पन्न बाजार समिती, जामखेड जि. दनगर यांचा पायाभूत सुविधा विकास प्रकल्प**

कृषि उत्पन बाजार समिती, जामखेड जि अहमदनगर या .बाजार समितीच्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पास दि .१५/१२/२०१७ रोजीच्या रा.कृ.वि.यो. च्या २४ व्या SLSC बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणी चा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| **कृषि उत्पन्न बाजार समिती, जामखेड पायाभूत सुविधा विकास प्रकल्प** | **एकुण अंदाजीत खर्च** | **रा.कृ.वि.यो. अनुदान** | **बा. स. ची स्वनिधी गुंतवणुक** | **वित्तीय संस्था/ कृषि पणन मंडळाचे कर्ज** |
|---|---|---|---|---|
| | १००% | २५% | ४२% | ३३ % |
| रा.कृ.वि.यो. अंतर्गत जामखेड जिअहमदनगर . याबाजार समितीच्या मुख्य बाजार आवार जामखेड व उपबाजार आवार खर्डा येथील आवारामध्ये विविध विकास कामे | ३.२३ | ०.८१ | १.३५ | १.०७ |

सदर प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या विविध प्रशासकीय मंजुरी संदर्भात कार्यवाही व पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

**३) राज्यातील ८६ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करणे**

धान्य साफसफाईसाठी व प्रतवारीसाठी धान्य चाळणी प्रतवारी यंत्र (Grain Cleaning and Grading Machine) सुविधा बाजार समितीच्या आवारामध्ये उभारणी केल्यास शेतकऱ्यांच्या शेतीमालास चांगला दर मिळू शकेल. याबाबीचा विचार करुन राज्यातील प्रामुख्याने धान्याची आवक असणाऱ्या बाजार समित्यांमध्ये नवीन धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी कृषि पणन मंडळामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजनेकडे तसेच ई- नाम योजनेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राज्यातील ३१ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेच्या नवीन धान्य चाळणी यंत्राची सुविधा उभारणी करण्यासाठी दि. १५/१२/२०१७ रोजीच्या २४ व्या SLSC बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि.०४/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणुन नियुक्त करण्यात आलेले आहे.

तसेच केंद्र शासनाच्या दि .२४/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये भारत सरकारच्या ई मना-योजनेअंतर्गत राज्यातील ५५ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेचे एक धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे .या दोन्ही प्रकल्पांचा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे;

(रुपये कोटी)

| **धान्य चाळणी प्रतवारी यंत्र प्रकल्प (क्षमता प्रत्येकी २ मे.टन प्रती तास)** | **एकुण अंदाजित खर्च** | **अनुदान** | **पणन मंडळ गुंतवणुक** | **बा.स.स्वनिधी गुंतवणुक/ पणन मंडळाचे कर्ज** |
|---|---|---|---|---|
| रा.कृ.वि.यो. : ३१ बा.स. | २१.६९ | ५.०५ | ३.५० | १३.१४ |
| ई-नाम : ५५ बा.स. | ३८.५९ | १८.६४ | -- | १९.९५ |
| **एकुण** | **६०.२८** | **२३.६९** | **३.५०** | **३३.०९** |

या प्रकल्पासाठी एकूण खर्च रु. ६०.२८ कोटी येणार असून राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत व ई-नाम योजने अंतर्गत एकूण अनुदान रु. २३.६९ कोटी मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये पणन मंडळामार्फत रु. ३.५० कोटीची गुंतवणूक केली जाणार आहे व उर्वरीत रक्कम रु. ३३.०९ कोटी बाजार समित्यांनी त्यांचे स्वनिधीमधून गुंतवणुक करावयाची आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना पणन मंडळाच्या मा.संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार स्वनिधीची रक्कम गुंतवणूक करण्यासाठी आवश्यकतेनुसार पणन मंडळामार्फत ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पांची अंमलबजावणी पणन मंडळामार्फत सुरु झालेली असुन प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्यावर सदर धान्य चाळणी प्रतवारी यंत्र वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत.

**४) राज्यातील १०८ बाजार समित्यांमध्ये एकूण १०८ गोदामांची उभारणी करणे**

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितींमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्याची ( Pledge Loan) व शासकीय हमीभाव खरेदी केंद्रा अंतर्गत शेतमाल साठवणुकीसाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे आवारामध्ये गोदामांची उभारणी करण्यासाठी दि. २५/०७/२०१८ रोजीच्या रा कृ वि यो च्या २५ व्या SLSC बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत राज्यातील एकूण १०८ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी १००० मेट्रिक टनाचे एक या प्रमाणे नवीन १०८ गोदामांची उभारणी होणार आहे. त्यासाठी एकूण खर्च रु. ११६.४६ कोटी येणार असून त्यापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजने कडून ३६ % अनुदान रु. ४१.८६ कोटी मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये पणन मंडळामार्फत रु. २३.१९ कोटीची गुंतवणूक केली जाणार आहे व उर्वरीत रक्कम रु. ५१.४१ कोटी बाजार समितीने स्वनिधीमधून गुंतवणुक करावयाची आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना पणन मंड़ळाच्या मा. सचालंक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आवश्यकतेनुसार स्वनिधीची रक्कम रु.५१.४१ कोटी ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज म्हणुन पणन मंडळामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणी चा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| **गोदाम प्रकल्प** | **एकुण अंदाजीत खर्च** | **रा.कृ.वि.यो. अनुदान** | **गोदाम प्रकल्प** | **एकुण अंदाजीत खर्च** |
|---|---|---|---|---|
| | १००% | ३६% | २०% | ४४% |
| रा.कृ.वि.यो. अंतर्गत राज्यातील १०८ बा.स. मध्ये प्रत्येकी १००० मे. टन. क्षमतेची एकुण १०८ गोदामे उभारणी करणे. | ११६.४६ | ४१.८६ | २३.१९ | ५१.४१ |

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि. १२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीची कार्यवाही पणन मंडळामार्फत सुरु करण्यात आली आहे. गोदाम बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर गोदामे वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरण करण्यात येणार आहेत. या योजनेमुळे राज्यामध्ये १,०८,००० मेट्रिक टन शेतीमाल साठवणूक क्षमता निर्माण होणार आहे.

# इ) संगणक विभाग

- **मार्कनेट प्रकल्प**

मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क. या अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसुत्रता आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील ३०० मुख्य बाजार व ६६ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा पणन मंडळामार्फत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहीती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहीती देवाण घेवाणसाठी लागणा-या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

- **राष्ट्रीय कृषि बाजार (eNAM) योजना**

केंद्र शासनाने शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी देशपातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारीत राष्ट्रीय कृषि बाजार (National Agriculture Market [NAM]) ही योजना सुरु केली. राष्ट्रीय कृषि बाजाराच्या कामकाजासाठी ई-ट्रेडींग प्लॅटफॉर्म कार्यान्वित करण्यात आला आहे. या योजनेची अंमलबजावणी एस.एफ.ए.सी. या केंद्र शासनाच्या संस्थे मार्फत करण्यात येत आहे. सदर संस्थेने योजनेच्या अंमलबजावणी साठी सेवा पुरवठादाराची नियुक्ती केली आहे. ई-नाम योजना १४ एप्रिल २०१६ पासुन कार्यान्वित करण्यात आली. महाराष्ट्रासह १६ राज्यातील तसेच २ केंद्रशासीत प्रदेशातील ५८५ बाजार समित्यां मार्च २०१८ पर्यत ई-नाम ला जोडण्याचे उद्दिष्ट पुर्ण करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील ६० बाजार समित्यांचा दोन टप्यामध्ये ई-नाम ला जोडण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्याचे कामकाज नोव्हेंबर २०१६ पासून व दुस-या टप्याचे कामकाज जानेवारी २०१८ पासून सुरु झाले आहे. बाजार समितीमध्ये आलेल्या सर्व शेतमालाची ई-नाम पोर्टलवर गेट एन्ट्रि, लॉट मॅनेजमेन्ट, शेतमालाची गुणवत्ता तपासणी, ई-ऑक्शन, शेतमालाच्या वजनाची नोंद, ऑनलाईन पेमेंन्ट व आऊट गेट एन्ट्रि या प्रमाणे ई-नामची कार्यप्रणाली आहे. राज्यातील पहिल्या टप्यातील ३० बाजार समित्यामध्ये शेतमालाची गेट एन्ट्री, असेईंग,ई-ऑक्शन व ई-पेमेंट सुरु झाले असून दुस-या टप्यातील ३० बाजार समित्यांमध्ये शेतमालाची गेट एन्ट्री सरु आहे.

मार्च २०१९ अखेर ई-नामची सद्यस्थिती खालिल प्रमाणे आहे;

**पहिला टप्पा**

- ३० बाजार समित्यांमध्ये ४१ लाख क्विंटल ई-ऑक्शन, एकूण किंमत रु.११७०/- कोटी.
- शेतमालाच्या गुणवत्ता तपासणी साठी ३० बाजार समित्यामध्ये असेईंग लॅब कार्यान्वित. एकूण १,४६,७७३ लॉटचे असेईंग.
- एकूण २३ बाजार समित्यांनी रु.३७.९० कोटी ई-पेमेंट केले आहे.
- ई-नाम पोर्टलवर ६,११,८८८ इतक्या शेतक-यांची, ७,८४९ इतक्या खरेदीदारांची व ७१३४ इतक्या आडत्यांची नोंदणी पुर्ण झाली आहे.
- देशात सर्वप्रथम शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सहभागाने लातूह व बमसत या दोन बाजार समित्यांमध्ये शेतमालाची विक्री.
- बसमत बाजार समितीमध्ये ई-वेमेंट सुरु.

**दुसरा टप्पा**

- ३० बाजार समित्यांमध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री सुरु.
- एकूण ५.७७ लाख क्विंटलचे ई-ऑक्शन, एकूण किंमत रु.१७७ कोटी.
- सर्व ३० बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅबची उभारणी पुर्ण.
- २१ बाजार समित्यामध्ये १८,००५ लॉटस् चे असेईंग केले.
- ६ बाजार समित्यांनी रु.०.३० कोटी चे ई-पेमेंट केले.
- ई-नाम पोर्टलवर ४,३२,१८१ इतक्या शेतक-यांची, ६,७६१ इतक्या खरेदीदारांची व ५,१८० इतक्या आडत्यांची नोंदणी पुर्ण झाली आहे.

- **डेटा सेंटर**

  संगणक विभागात स्वतंत्र डेटा सेंटर कार्यरत असुन यामध्ये सर्व्हर्स, फायरवॉल, सॅन स्टोरेज, टेप लायब्ररी यासह आवश्यक आय.टी. व नॉन-आय.टी. सामुग्री कार्यरत आहे. सदर डेटा सेंटर मध्ये बाजार समित्यांची ई-ऑक्शन संगणक प्रणाली, ई.आर.पी. संगणक प्रणाली, पणन मंडळ व पणन संचालनालय यांचेसाठी ऑनलाईन संगणक प्रणाली, पणन मंडळाची वेबसाईट व मेल सुविधा, डेटाबेस, टॅली संगणक प्रणाली इ. कार्यरत आहेत. यासाठी आयटी व नॉन आयटी सामुग्रीसह डेटा सेंटर २४ तास कार्यरत असते. इंटरनेट साठी २० एम.बी.पी.एस. ब्रॉड बॅन्ड व २० एम.बी.पी.एस. लिज्ड लाईन चे नेटवर्क कार्यरत आहे.

- **डी.एम.आय. भारत सरकार यांचे कडून संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता**

  डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत अँगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणा-या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.८६.२६/- लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

- **ऑनलाईन संगणक प्रणाली**

कृषि पणन मंडळाच्या कामकाजासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करुन कार्यन्वीत करण्यात आल्या आहेत. बाजार समित्यांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, अर्थसंकल्प, अंशदान, कर्ज, शेतमाल तारण इ. कामकाजासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली सुरु आहेत. पणन संचालनालयामार्फत थेट खरेदी, एकल परवाना व खाजगी बाजार याबाबतचे परवाने व बाजार समित्यांचे कलम १२(१) प्रस्तांवांना मंजुरी यासाठी ऑनलाईन संगणक प्रणालींचा वापर होत आहे. बाजार समिती व खाजगी बाजार यामध्ये होणारी आवक व दर तसेच थेट खरेदी परवानाधारकांकडून केली जाणारी खरेदी याबाबत माहिती ऑन-लाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. व्हेपर हिट ट्रिटमेंट व इरॅडीएशन फॅसिलीटी सेंटर नवी मुंबई येथिल निर्यात सुविधा केंद्र करीता स्लॉट बुकिंग ऑन-लाईन करण्यात आले आहे. कृषि पणन मंडळाचे बहुतांश कामकाज ऑनलाईन संगणक प्रणाली द्वारे सुरु आहे. या सर्व ऑनलाईन संगणक प्रणालींची उभारणी पणन मंडळाच्या डेटा सेंटर मध्ये केली आहे. राज्यातील सर्व बाजार समित्यांना प्रस्ताव सादर करणे, कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयांना सदर प्रस्तावांची ऑनलाईन छाननी करुन सादर करणे व मुख्यालयामार्फत मंजूरी देणे ऑनलाईन संगणक प्रणालींमुळे सोईचे झाले आहे. या मुळे प्रस्ताव सादर करणे व त्यास मंजूरी देणे या कामकाजामध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आली असून वेळेची बचत होत आहे.

- **सांख्यिकीय माहिती**

बाजार समित्यांकडून प्राप्त होत असलेले दैनिक, वार्षिक बाजारभाव व आवक, तसेच बाजार समित्यांची इतर सर्वसाधारण माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेस चा उपयोग करुन बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व बाजारभाव याबाबत तुलनात्मक माहिती आवश्यकते प्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

## बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी / शेतकरी प्रशिक्षण

कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना तसेच बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रातील शेतक-यांना कृषि पणन मंडळामार्फत, तळेगांव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ अखेर राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव मार्फत बाजार समिती अधिकारी / कर्मचारी यांना बाजार समित्यांचे कामकाज व नविन कायदे, संगणक विषयक प्रशिक्षण, बाजार समित्यांचा अर्थसंकल्प व लेखे विषयक टॅली संगणक प्रणाली इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते तर शेतक-यांसाठी हरीतगृह व्यवस्थापन, नर्सरी व्यवस्थापन, शेड नेट, टिश्यू कल्चर, लॅन्ड स्केप, मार्केटिंग इ. विषयाअंतर्गत अहवाल काळात एकूण ८७ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले व या प्रशिक्षणा अंतर्गत एकूण २३६५ प्रशिक्षणार्थिंना प्रशिक्षित करण्यात आले.

## 'कृषि पणन मित्र' मासिक

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला ' कृषि पणन मित्र' मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक दर महा मासिकाचे वर्गणीदार, राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मासिकामध्ये कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, सुगी पुर्व व सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर विविध तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.

अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या :-

| अ.क्रं. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०१८ | १६०५६ |
| २. | मे २०१८ | १७४१९ |
| ३. | जून २०१८ | १७९३१ |
| ४. | जुलै २०१८ | १८०६१ |
| ५. | ऑगस्ट २०१८ | १८१३५ |
| ६. | सप्टेंबर २०१८ | १८०३८ |
| ७. | ऑक्टोबर २०१८ | १७८२१ |
| ८. | नोव्हेंबर २०१८ | १८०८१ |
| ९. | डिसेंबर २०१८ | १७६७७ |
| १०. | जानेवारी २०१९ | १८०७१ |
| ११. | फेब्रुवारी २०१९ | १७७७० |
| १२. | मार्च २०१९ | १७६२३ |

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत.

## कृषि पणन मंडळाची दिनदर्शिका २०१९ व दैनंदिनी २०१९

सन २०१९ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई करुन, मंडळाचे दिनदर्शिकेवर कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांची माहिती व दैनंदिनीमध्ये राज्यातील बाजार समित्या, कृषि विभाग, सहकार विभाग, मंत्रालयातील अधिकारी वर्ग इत्यादी बाबत माहिती छापण्यात येते. सदर दिनदर्शिका व दैनंदिनी यांच्या प्रती राज्यातील बाजार समित्या, सर्व सहकारी संस्था, मंत्रालयातील पदाधिकारी व अधिकारी, पणन मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. सदर दिनदर्शिका व दैनंदिनी मार्फत कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी चांगला उपयोग होत आहे.

## प्रदर्शन / कार्यशाळा / चर्चासत्र / परीषद सहभाग व आर्थिक मदत

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांना करुन देण्याच्या दृष्टिकोनातून, राज्यातील विविध भागातील प्रदर्शनामध्ये सहभाग घेण्यात येतो. तसेच सदर प्रदर्शनामध्ये सक्षम अधिका-यांचे मंजुरीने सहभाग घेवून, मंडळाचे विविध योजना / उपक्रम याचा प्रचार व प्रसिध्दी करून, त्यामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यातील विविध १६ प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतलेला आहे.

तसेच आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य व कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. या अनुषंगाने कृषि पणन मंडळाचे मा. संचालक मंडळाचे व वरिष्ठांचे मान्यतेने सन २०१८-२०१९ मध्ये खालील संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | श्री स्वामी समर्थ कृषि विकास व संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक | जागतिक कृषि महोत्सव २०१८ | ५०,०००/- |
| २. | ॲग्रोव्हिजन फाऊंडेशन | ॲग्रोव्हिजन १० वे | १५०००००/- |
| ३. | शेती उत्पन्न बाजार समिती, कराड, जि. सातारा | स्व. यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शन २०१८ | ५०,०००/- |
| ४. | Indian Society Of Alliums, Rajgurunagar | परिषद २०१९ | २,००,०००/- |
| ५. | लोकमत मिडीया प्रा. | जागतिक संत्रा महोत्सव २०१९ | २,००,०००/- |
| ६. | सकाळ - ॲग्रोवन | ॲग्री एक्स्पो २०१८ | १,००,०००/- |

## कृषि पणन मंडळ जाहिरात

कृषि पणन मंडळाची खालील मासिकांमध्ये व पोस्टाच्या कॅलेंडरसाठी जाहिरात देण्यात आली. मासिकांतील व पोस्टातील जाहिरातीमुळे पणन मंडळास विविध भागातून उदा. ग्राम पातळीवर, शहर पातळीवर प्रसिध्दी मिळते तसेच पणन मंडळाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचते.

| अ.क्र. | संस्थेचे / मासिकाचे नाव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | दै. ' ॲग्रोवन ' | वर्धापन दिन विशेषांक | १८०००० |
| २. | योध्दा शेतकरी | राष्ट्रीय किसान परिषद, पुणे विशेषांक - २०१८ | ५०००० |
| ३. | SIAL BIZ INDIA | मासिक विशेषांक | २००००० |
| ४. | दि. पुणे पोस्ट ॲन्ड टेलिकॉम को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पुणे | दिनदर्शिका २०१९ | ९००० |
| ५. | दै. देशोन्नती | दिवाळी विशेषांक २०१८ | ८४००० |
| ६. | दै. पुढारी | वर्धापन दिन विशेषांक | १५८४० |
| ७. | दै. लोकमान्य सांजवार्ता | वर्धापनदिन विशेष अंक | ७४२५ |
| ८. | दै. पुण्यनगरी | २० वा वर्धापनदिन विशेषांक | ३०००० |

## प्रसिद्धी

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

## लेख प्रसिध्दी

लेख प्रसिध्दी – कृषि पणनाशी संबंधित माहिती शेतकरी, सह. संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेमार्फत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशिल आहे. कृषी पणनाशी संबंधित माहितीवर आधारित विविध लेख अहवाल वर्षात प्रसिध्द करण्यात आले आहेत.

## दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये दूरदर्शन, मुंबई व दूरदर्शन केंद्र, पुणे वरुन "कृषि दर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाचे श्री. महेंद्र लोखंडे , डॉ. भास्कर पाटील, श्री. दिगंबर साबळे, श्री. सतिश व-हाडे, श्री मिलिंद जोशी, श्री सचिन खरमाळे, श्री. जे. जे. जाधव इ. या अधिका-यांचे कार्यक्रम प्रसारित करण्यात आले.

## ग्रंथालय

कृषि पणन मंडळातील अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता कायदा इ. विषयांवरील पुस्तके उपलब्ध असून त्यांचा आवश्यकतेनुसार वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच दरवर्षी कृषि पणन, निर्यात इ. विषयांवरील राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावरुन प्रसिध्द होणारी मासिके, त्रैमासिके, नियतकालिके ग्रंथालयात येतात.

ग्रंथालय विभागामार्फत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅन्ड अॅग्रीकल्चर इ. विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेण्यात आले आहे. ग्रंथालयात दररोज १२ दैनिके येत असून या दैनिकांमधून विविध विषयांवरील कात्रणे काढून त्यांचेही विषयावर संकलन करण्यात येते. तसेच कृषी आणि पणन विषयांवरील बातम्या व्हॉटस अॅप तसेच ई-मेल व्दारे संबंधितांना पाठविण्यात येतात. यामुळे कृषी पणन विषयक वृत्तपत्रांमधून आलेल्या बातम्यांची माहिती वरिष्ठांना होण्यास तसेच उपस्थित बाबींवर आवश्यक कार्यवाही करण्यास मदत होत आहे.

# प) कृषि व्यापार विकास विभाग

### उदिष्टे

कृषी विपणन ही अतिशय महत्वाची क्रिया आहे. देशांतर्गत व्यापार विकास विभागाचा मुख्य उद्देश शासकीय योजना आणि कृषि पणन मंडळाने विकसित केलेल्या विविध उपक्रमांच्या मदतीने शेती व्यापार विकसित करणे हा आहे. शेतकरी आणि ग्राहकांसाठी थेट विक्री व्यवस्था तयार करणे, खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन करणे, शेतकऱ्यांसाठी शेतमाल विक्रीकरीता नवनवीन योजना तयार करणे, नवीन आणि संभाव्य बाजारपेठांची माहिती घेणे व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे ही देशांतर्गत व्यापार विकास विभागाची प्रमुख कार्ये आहेत.

### उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपक्रम

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम आंबा महोत्सवाद्वारे सन २००३ पासून राबविण्यात येत आहे. हा उपक्रम पुढे सुरु रहावा या उद्देशाने कृषि पणन मंडळाने फळ व धान्य महोत्सव या योजनेची सुरुवात केली.

### १) फळ व धान्य महोत्सव अनुदान योजना

कृषि पणन मंडळ आंबा, द्राक्ष, संत्रा या सारख्या हंगामी फळे व काजू, गुळ बेदाणा इ. उत्पादनांचे महोत्सव आयोजीत करते व याद्वारे आयोजकांना अनुदान अदा केले जाते.

**लाभार्थी-** राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषी व पणनशी संबधित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग, शेतकरी उत्पादक कंपन्या, पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट व अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था.

### नियम व अटी

१. महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.
२. महोत्सवास प्रतिस्टॉल रु.२,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.
३. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.
४. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा., बॅनर्स, जाहिरात, बातम्या, बॅकड्रॉप, हँण्ड बिल्स, इ. मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजक संस्थेवर बंधनकारक राहील.
५. कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये सहभाग घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करुन देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.
६. आयोजक संस्थेला सभासदांना 'कृषि पणन मित्र' मासिकाचे वर्गणीदार करावे लागेल.
७. महोत्सव आयोजनापूर्वी कृषि पणन मंडळाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.
८. महोत्सवाचा अहवाल आणि काही निवडक फोटो आमच्या मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी पणन मंडळाकडे सादर करावेत.
९. महोत्सवातील कृषि मालाची प्रत, दर व इतर अनुषंगिक व कायदेशीर बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही, तथापी चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांचेवर बंधनकारक राहील, याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील.
१०. महोत्सव अनुदानासाठीचा प्रस्ताव अपूर्ण असल्यास व अटी, शर्तीची पूर्तता न केल्यास अनुदान देय होणार नाही.

११. महोत्सव हा फक्त उत्पादकांकरीता असल्याने त्यामध्ये व्यापाऱ्यांना सहभागी होता येणार नाही किंवा मार्केटमधुन आणुन मालाची विक्री करता येणार नाही, असे आढळून आल्यास आयोजकांना अनुदानासाठी अपात्र ठरविले जाईल.
१२. महोत्सवाकरीता इतर कोणत्याही शासकिय योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.
१३. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु.१००/- च्या स्टँप पेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

**सन २०१८-२०१९ मध्ये आयोजीत फळ व धान्य महोत्सवाचा तपशिल**

| अ. क्र. | तपशिल | मुख्यालय / विभागीय कार्यालय | महोत्सव कालावधी व ठिकाण | अनुदान / खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | फळ व धान्य महोत्सव (मूळ योजना) | पुणे | कृषि उत्पन्न बाजार समिती, कोरेगाव, आंबा व धान्य, दि.१४ ते १९ मे २०१८, मुख्य बाजार आवार, कोरेगाव, जि.सातारा | ६०००० |
| | | | कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज, आंबा, दि.१९.०५.२०१८ ते दि.२३.०५.२०१८, बाजार समिती आवार, अकलूज, जि.सोलापूर | २४००० |
| | | कोल्हापूर | कृषि उत्पन्न बाजार समिती, सातारा, आंबा व कडधान्य, दि.०७ ते ११ मे २०१८, सातारा न्यु इंग्लिश स्कुल, सातारा | ९४००० |
| | | रत्नागिरी | रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समिती, रत्नागिरी , आंबा महोत्सव | १००००० |
| | | | कृषि उत्पन्न बाजार समिती, पनवेल, जि. ठाणे, आंबा महोत्सव | ३०००० |
| २ | विभागीय कार्यालयामार्फत आयोजीत महोत्सव | पुणे | आंबा, दि.१०.०५.२०१८ ते दि.१४.०५.२०१८, पिंपरी स्टेशन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या मागे, पी.एम.टी. बस स्टँडची मोकळी जागा, पिंपरी, पुणे-१८ | १८१६७१ |
| | | | आंबा, दि.२३.०४.२०१८ ते दि.२७.०४.२०१८, महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला, (नॉर्थ कोर्ट) सोलापूर | ५००००० |
| | | नाशिक | आंबा, दि.१५.०५.२०१८ ते दि.२०.०५.२०१८, रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड, नाशिक | १०३२०० |
| | | नागपूर | फळ व धान्य, दि.२१.१२.२०१८ ते दि.२५.१२.२०१८, गडचिरोली | ४३४०० |
| | | | फळ व धान्य, दि.२२.१२.२०१८ ते दि.२६.१२.२०१८, भंडारा | ४७१९४ |
| ३ | मुख्यालयामार्फत आयोजीत महोत्सव | मुख्यालय | आंबा महोत्सव, दि.०२.४.२०१८ ते १२.०६.२०१८ | १३०८०५२ |
| | | बालगंधर्व रंगमंदीर | आंबा महोत्सव, दि.१३.०४.२०१८ ते दि.२२.०४.२०१८ | १४७४५५ |
| | | श्री. गणेश कला क्रिडा रंगमंच | गुळ,बेदाणा,हळद,काजू महोत्सव, दि.१७ ते २१ ऑक्टोबर २०१८ | ३४८५५५ |
| | | | **एकूण -** | **२९८७५२७** |

**आंबा महोत्सव २०१८**

कृषि पणन मंडळातर्फे सन २००३ पासून आंबा महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. या अंतर्गत उत्पादक व ग्राहक या दोघांचाही फायदा होत असल्याने पुणे शहरात या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो. त्यामुळे सदर उपक्रम हा नित्यवार्षीक उपक्रम (calendar activity) म्हणून राबविला जातो.

'आंबा महोत्सव २०१८' चे आयोजन दि.०२ एप्रिल २०१८ ते दि.१० जुन २०१८ या कालावधीत पणन मंडळाच्या कार्यालयाच्या शेजारील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधन संस्थेच्या वसतीगृहाच्या जागेमध्ये करण्यात आले होते. याठिकाणी सुमारे ६३ स्टॉलची उभारणी करण्यात येऊन सुमारे ७८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. याशिवाय बालगंधर्व रंगमंदिर येथे आंबा विक्री करण्याचे नियोजन करण्यात आले होते.

थेट उत्पादक ते ग्राहक उपक्राअंतर्गत आंबा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला असून ग्राहकांना खात्रीशीरपणे कोकणात उत्पादित झालेला आंबा उपलब्ध झाला. या उपक्रमाअंतर्गत सुमारे १० ते ११ कोटी रुपये आंबा विक्रीची उलाढाल झाली.

**संत शिरोमणी श्री सवता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान**

शेतकरी आठवडे बाजार ही संकल्पना शेतमालाची उत्पादकांकडून थेट ग्राहकांना विक्री अशी आहे. काढणीपश्चात कमीतकमी हाताळणी करुन ताजा शेतमाल मध्यस्थांना वगळून या बाजारपेठांच्या माध्यमातून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविणे शक्य होते. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीतून चांगला आर्थिक मोबदला मिळतो तर ग्राहकांनासुध्दा चांगल्या प्रतीचा ताजा शेतमाल रास्त दरात उपलब्ध होतो.

मध्यस्थांमुळे काही फळे व भाज्यांच्या किंमतीत कृत्रिम वाढ होते, ज्यामुळे व्यापारी आणि कमिशन एजंट्स हेच अधिकतर नफा कमवतात व शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा कमीतकमी मोबदला मिळतो. शेतकरी आठवडे बाजार ही शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाच्या विक्रीसाठी एक पर्यायी विपणन प्रणाली/बाजारपेठ आहे. याबाबत राज्यामध्ये "संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान" राबविण्याचा शासनाने दि.१२ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला व या द्वारे महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली.

**शेतकरी बाजाराचे फायदे**

**शेतकरी**

- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उत्पादक सहकारी संस्था यांचेमार्फत थेट ग्राहकांना शेतमाल विक्रीची संधी
- कृषि माल शेतातून थेट बाजारात येत असल्याकारणाने काढणी नंतरच्या होणाऱ्या नुकसानीत मोठी घट
- रोख स्वरूपात १०० टक्के मालाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या हातात
- आपल्या मालाचा बाजार भाव ठरविण्याचा शेतकऱ्याला अधिकार
- ग्राहक आणि शेतकरी यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होते
- ग्राहकांच्या मागणीनुसार मालाचा पुरवठा
- थेट विक्रीमुळे मध्यस्थांना मिळणारी रक्कम थेट शेतकऱ्याला प्राप्त
- बाजारात विक्री होणाऱ्या मालाचा अंदाज आल्याने भाजीपाला शिल्लक रहात नाही.

**ग्राहक**

- ताजा स्वच्छ शेतमाल थेट शेतकऱ्यांकडून उपलब्ध
- शेतकरी विक्री करीत असल्याकारणाने मालाच्या प्रती बाबत खात्री
- थेट शेतकऱ्यांशी संवाद होत असल्याकारणाने ग्राहक आपली गरज शेतकऱ्याला सांगू शकतात.
- थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदीचे ग्राहकांना समाधान
- घराजवळ भाजीपाला बाजार पेठ उपलब्ध
- भाजीपाला खरेदीचे आठवड्याचे नियोजन करता येते
- एकाच छताखाली भाजीपाला, फळे, प्रक्रिया उत्पादने, ग्रामिण उत्पादने ग्राहकांना उपलब्ध
- शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत होत असल्याने ग्राहकांना वजनाबाबत विश्वास

सद्यस्थितीत राज्यात १२ शहरात एकूण ११० बाजार कार्यरत आहेत.

**आंतरराज्य शेतमाल व्यापार: रस्ते वाहतूक अनुदान योजना**

महाराष्ट्र राज्य फळे व भाजीपाला उत्पादनात देशात आघाडीवर आहे. कांदे, टोमॅटो, डाळींब, द्राक्षे, केळी व आंबा हे प्रमुख फळे आणि भाज्या आहेत. फळे आणि भाजीपाला नाशवंत आहे आणि अयोग्य हाताळणी आणि साठवण पद्धतीमुळे तसेच वाहतूक विलंबामुळे फळे व भाजीपाल्यांचे काढणीपश्चात सुमारे २० ते ३० टक्के नुकसान होते. मागणी आणी चांगला दर यामुळे निर्यातीप्रमाणे देशांतर्गत व्यापार सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. मूलतः शेतकरी त्यांच्या दैनंदिन नित्यक्रमांमध्ये बदल करण्याच्या मानसिकतेत नसतो यामुळे वाहतूक भाडे भरुन शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी तयार होत नाही. शेवटी ते त्यांचे उत्पादन जवळच उपलब्ध असलेल्या बाजारपेठेत विकतात. तथापि, अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना इतर राज्यात पाठविण्याचे महत्त्व लक्षात आलेले आहे. म्हणून या परिस्थितीचा आणि व्यावहारिक बाबींचा अभ्यास करून आंतरराज्य व्यापारास प्रोत्साहन देण्यासाठी कृषि पणन मंडळाने रस्ते वाहतूक अनुदान योजना राबविण्याचा निर्णय घेतला.

**सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे;**

१. सदर योजना केवळ महाराष्ट्रातून रस्ते वाहतूकीद्वारे परराज्यात शेतमाल वाहतूक व विक्री करण्यात येणाऱ्या शेतमालास लागू राहील.
२. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था पात्र लाभार्थी असतील.
३. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या उत्पादक सभासदांनी स्वत: उत्पादित केलेला मालच संबधीत राज्यामध्ये पाठविणे आवश्यक आहे.
४. योजनेंतर्गत कामकाज सुरू करणेपुर्वी पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.
५. सदर योजना आंबा, केळी, डाळींब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला पिकांसाठी लागू राहील.
६. मुद्दा क्र.५ मध्ये नमूद नसलेला शेतमाल परराज्यात विक्री करावयाचा झाल्यास लाभार्थी संस्था/ कंपनीने तसा स्पष्ट उल्लेख करून पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.
७. सदर योजनेमध्ये रस्तेमार्गे प्रत्यक्ष वाहतूक होणा-या शेतमालावर अनुदान देय राहील. यामध्ये इतर कोणत्याही अनुषंगिक खर्चाचा अंतर्भाव असणार नाही तसेच शेतमाल प्रत्यक्ष विक्री झालेनंतरच अनुदान देय राहील.
८. या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष वाहतूक केलेल्या अंतरानुसार खालीलप्रमाणे अनुदान देय असेल;

| अ.क्र. | अंतर | देय अनुदान |
|---|---|---|
| १ | किमान ७५० ते १००० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.३०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| २ | १००१ ते १५०० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.४०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ३ | १५०१ ते २००० कि.मी.पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ४ | २००१ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.६०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ५ | सिक्कीम, आसाम, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम व त्रिपुरा या राज्यासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.७५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |

९. या योजनेअंतर्गत एका लाभार्थी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनीस योजना कालावधीसाठी कमाल ६ वेळा वाहतूक अनुदान देय असेल.
१०. या योजनेअंतर्गत बिगर कृषिमालाची वाहतूक केल्याचे आढळल्यास त्यासाठी अनुदान देय असणार नाही.
११. शेतकरी उत्पादक कंपनी/संस्थेस वाहतूकदारास देय असलेली वाहतूक भाड्याची रक्कम धनादेश/आरटीजीएस/ऑनलाईन बँकींगद्वारे अदा करणे बंधनकारक राहील.
१२. शेतकरी उत्पादक कंपनी/संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाची प्राप्त विक्री रक्कम प्रत्यक्ष सभासद शेतक-यांच्या खात्यावर जमा केल्यानंतर लाभार्थी अनुदानासाठी अर्ज करू शकतील.
१३. शेतकरी उत्पादक कंपनी/संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाला गुणवत्तेअभावी अथवा अन्य कारणामुळे रक्कम प्राप्त न झाल्यास त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जबाबदार असणार नाही तसेच सदर प्रकरणी वाहतूक अनुदान देय असणार नाही.
१४. अनुदान संपुर्णपणे नामंजूर, अंशत: मंजूर अथवा पुर्णपणे मंजूर करण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारावर बंधनकारक असेल. तसेच, योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये उचित बदल करण्याचे अधिकार पणन मंडळास राहतील.
१५. संबंधीत संस्था/कंपनी यांनी या योजनेअंतर्गत परराज्यात पाठविण्यात आलेल्या वाहतूक खर्चाचे अनुदान मागणी प्रस्ताव माल विक्रीनंतर ३० दिवसांत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

**शेतमाल व्यापार वृद्धिसाठी कृषि पणन मंडळाकडून परराज्यात व्यापार प्रतिनिधींची नियुक्ती**

राज्यातील उत्पादित होणा-या कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेसाठी कृषि पणन मंडळाने आंतरराज्य व्यापारवृद्धीच्या कामकाजासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या ६ अधिकाऱ्यांची दि.१५ डिसेंबर २०१८ ते दि.३१ जानेवारी २०१९ या कालावधीत परराज्यात व्यापार प्रतिनिधी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आली.

महाराष्ट्रातील फळे व भाजीपाल्याचे उत्पादन पाहता, निर्यातीबरोबरच देशांतर्गत व्यापारही महत्वाचा असल्याने राज्यात उत्पादीत होणाऱ्या शेतमालास परराज्यात बाजारपेठ मिळवून थेट व्यापारास चालना देणे आवश्यक आहे. यासाठी श्री. मिलिंद जोशी (पंजाब/हरियाणा/चंदीगड) श्री. जे.बी.जगताप (तामिळनाडू), श्री. एस.डी.मेहेरकर (आसाम), श्री. एफ.एफ. सिद्दीकी (राजस्थान), श्री. एम.के.फळे (पश्चिम बंगाल) व श्री. आर.जे.गोरे (दिल्ली) या अधिकाऱ्यांची व्यापार प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

**उद्दिष्टे**

- नेमून दिलेल्या राज्यात आपल्या राज्यातील आर्थिकदृष्ट्या महत्वाच्या शेतमालासाठी पर्यायी विक्री व्यवस्था विकसित करणेसाठी प्रयत्न करणे
- या करीता संबंधित राज्याचे कृषि पणन मंडळ, पणन महासंघ, बाजार समित्या, संबंधित राज्य सरकारी व निमसरकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांना भेटून याबाबतच्या संभाव्य शक्यतांचा अंदाज घेणे
- कृषिमालाच्या आंतरराज्य व्यापारासाठी संबंधित राज्यातील कायद्यांच्या तरतुदींची व त्यानुसारच्या विविध पणन खर्चाच्या बाबींची माहिती घेणे
- राज्यातील कांदा, टोमॅटो, द्राक्षे, डाळिंब, केळी, संत्रा, बेदाणा, हापूस व केशर आंबा इ. कृषिमालाच्या थेट किरकोळ व ठोक विक्रीसाठी संबंधित राज्यातील संधींचा अभ्यास करणे

- संबंधित राज्यातील बाजार समित्या, मोठे ठोक व्यापारी व व्यापाऱ्यांच्या संघटना यांचे अधिकारी / पदाधिकाऱ्यां यांच्या भेटी गाठी घेवून परस्पर संबंध व संवाद वृध्दिंगत करणे व संभाव्य खरेदीदार निश्चित करणे
- प्राप्त केलेली उपयुक्त बाजार माहिती / आकडेवारीचे संकलन व विश्लेषण करणे.
- केलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने प्राप्त माहितीनुसार नेमून दिलेल्या राज्यातील विविध प्रकारच्या शेतमालासाठी मागणी व पुरवठा लक्षात घेवून प्रत्यक्ष शेतमाल विक्री बाबत माहितीचे संकलन करुन त्याप्रमाणे आराखडा बनविणे
- नेमून दिलेल्या राज्यातील मोठे संस्थात्मक ग्राहक, प्रकियादार यांचेशी संपर्क साधून त्यांचेकडून राज्यातील शेतमालासाठी ऑर्डर्स मिळविणे
- त्याप्रमाणे शेतकरी उत्पादक कंपन्यांशी समन्वय ठेवून मागणीप्रमाणे कृषि मालाचा संबंधित राज्यात पुरवठा करणे.

या राज्यातील केलेल्या कामकाजाचा अहवाल व्यापार प्रतिनिधींनी सादर केलेला आहे. सदर राज्यातील मोठे व्यापारी, संस्थात्मक ग्राहक व प्रकियादार यांचेशी संपर्क साधून त्यांची एकत्रित माहिती महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याचा लाभ शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, विविध संस्था यांना होत आहे. विशेषत: कांदा व डाळिंब या उत्पादनांचा मोठ्या प्रमाणावर तामिळनाडू, दिल्ली तसेच पश्चिम बंगालमध्ये विविध उत्पादक कंपन्यांकडून पाठविण्यात येत आहे.

## फ) तळेगाव शेती विभाग

- कृषि पणन मंडळाच्या शेती विभाग,तळेगाव अंतर्गत १५० एकर जमिन क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मुख्यफार्म व गिलबिल पट्टी असे दोन वेगवेगळया ठिकाणी असून मुख्यफार्म हे प्रक्षेत्र तळेगाव गाव भागास लागून आहे. आणि गिलबिल पट्टी हे प्रक्षेत्र मुंबई – पुणे महामार्गास लागून आहे.

**गिलबिल पटटी प्रक्षेत्र तपशील मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील**

| **अ.क्र** | **गिलबिल पटटी तपशिल** | **क्षेत्र (एकर)** |
|---|---|---|
| अ) | राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था | २८.०० |
| **ब)** | पदवीत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय व निर्यात सुविधा केंद्र | ०१.०० |
| क) | फळबाग लागवडी खालील क्षेत्र (आंबा,पेरु,नारळ व आवळा) | १२.०० |
| ड) | नाला,रस्ते,इमारत व पडीक क्षेत्र | ०९.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **५०.००** |

**फळबाग**

- सदर प्रक्षेत्रावर आंबा , पेरु, नारळ, आवळा फळबाग फळझाडे अस्तित्वात आहेत. सदर फळबागचे व्यवस्थापन जानेवारी २०१९ पासून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था पाहत आहे.

**मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील**

| **अ.क्र** | **मुख्यफार्म तपशिल** | **क्षेत्र (एकर)** |
|---|---|---|
| **अ)** | लागवडी योग्य क्षेत्र | ३०.०० |
| ब) | तलावाखालील क्षेत्र (पाण्याचे क्षेत्र – अंदाजे २७ - २८ एकर) | ४१.०० |
| क) | मत्स्यतळी | ०१.०० |
| ड) | नाला,रस्ते,इमारत , पडीक क्षेत्र,मत्स्यतळी व न्यायालयीन बाब | २८.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **१००.००** |

- मुख्यफार्मवरील अ.क्र. '**ब**' तलाव क्षेत्र (४२ एकर) मच्छिमारीसाठी पाच वर्ष करारावर मावळ तालुका मच्छिमार को- ऑप सोसायटी,तळेगाव यांचेकडून पाचव्या वर्षाची सन २०१७ - १८ साठी रक्कम रु.५८,०००/- प्राप्त झालेली आहे. न्यायालयीन आदेशानुसार सन २०१८ – १९ मध्ये तलावाच्या पुढील कराराबाबत निर्णय घेणे प्रतिक्षाधीन आहे. अ.क्र. '**क**' पाण्याची दोन तळी (१ एकर) श्री. सिकीलकर ,तळेगाव यांना मत्स्यमारीसाठी कराराने पाचवर्षासाठी दिलेली आहेत. सन २०१७ - २०१८ ची रक्कम रु.३६,०००/- प्राप्त झालेली आहे. पुढील कराराबाबत न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार निर्णय घेणे प्रतिक्षाधीन आहे.

- **मुख्यफार्म येथील जमीन क्षेत्राची शासकीय मोजणी करुन घेण्यात आलेली आहे.**

- मुख्यफार्म येथील शेत जमीन लागवडीखाली आणण्यासाठी पाणी पाईपलाईन दुरुस्ती व जमीन क्षेत्रास कंपाऊड करणे. इ. कामकाज अभियंत्रिकी विभागाकडून चालू आहे.

*****